पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २२**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. ३/९/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ४५७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/७/२०२० ते दि.३१/७/२०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/१८०८ दि.१८/८/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४५८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जुलै २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/२४५० दि.२१/८/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ४५९**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. २६/८/२०२० चे पत्र.

देवाची उरळी, फुरसुंगी येथे सुमारे ३० वर्षापासुन कचरा डेपो कार्यरत आहे. कचरा डेपोमुळे देवाची उरळी, फुरसुंगी व लगतच्या गावांमधील जमीन, हवा व पाणी प्रदुषित झालेले असून पर्यावरणाचा मोठया प्रमाणावर ऱ्हास होत आहे. सदर ठिकाणी कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असुन त्यांना दैनंदिन जीवनात प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सद्यस्थितीत सदर कचरा डेपोत लाखो मे.टन कचरा पडुन असून त्यावर बायोमायनिंग प्रक्रिया सुरु आहे तसेच सदर कचरा डेपोत दररोज शेकडो मे.टन रिजेक्ट कचरा नव्याने येत आहे. सदर वस्तुस्थिती असताना देखील प्रशासनाने २०० मे.टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्प, मशिनरी उभारणे व १५ वर्षांकरीता देखभाल दुरुस्ती करणे हा नविन प्रकल्प पुन्हा त्याच ठिकाणी उभारण्याचा घाट घातलेला आहे. सदर प्रकल्पाकरीता मे.भुमी ग्रीन एनर्जी या ठेकेदाराने भरलेले दर हे मनपाकडील अन्य प्रकल्पांच्या तुलनेने जादा असल्याने मनपास १०० कोटींहून अधिक रक्कम खर्च करावी लागणार आहे. सदर ठिकाणी नव्याने कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास देवाची उरळी, फुरसुंगी येथील ग्रामस्थ व नागरिकांचा तीव्र विरोध पाहता भविष्यात कोटयावधी रुपये खर्च करुन उभा केलेला कचरा प्रक्रिया प्रकल्प बंद पडल्यास पुणे मनपा अर्थसंकल्पीय निधीतील कोटयावधी रुपयांच्या महसुलाची हानी होवून मनपाचे पर्यायाने करदात्या पुणेकरांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. पुणे मनपाने बंद पडलेले कचरा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित केल्यास अगर सध्या चालू असलेले कचरा प्रकल्प पुर्ण क्षमतेने चालविल्यास प्रशासनास सदर वादग्रस्त प्रकल्प उभारण्याची कोणतीही गरज पडणार नाही.

सबब, मा.महापालिका आयुक्तांनी विशेष अधिकाराचा वापर करुन देवाची उरळी, फुरसुंगी येथील नियोजित २०० मे.टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्प, मशिनरी उभारणे व १५ वर्षांकरिता देखभाल दुरुस्ती करणे हा वादग्रस्त प्रकल्प आदेशान्वये तात्काळ रद्द करुन देवाची उरळी, फुरसुंगी येथील ग्रामस्थ व नागरिकांना न्याय द्यावा.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ४६०**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/७/२०२० ते दि.३१/७/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/२४७ दि.२४/८/२०२० चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ४६१**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि. २९/६/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोविड–१९ विषाणू संसर्ग रोखणेकामी उपाययोजना व उपचार करणेकरीता विविध साधनसामुग्री खरेदी करणेसाठी र.रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक,हेरिटेज अंतर्गत विविध कामे करणे, पान क्र. २७४, यादी क्र. एसजे२१, बजेट कोड- सीई२२अे७०५/एसजे२१-३४, प्रभाग क्र. १५ क मध्ये जुने मंडई जतन व संवर्धन संग्रहालय करणे | १ कोटी | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| पुणे शहरामध्ये हेल्थ प्लॅन अंतर्गत रेफेरेन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च बजेट कोड - आरई१७एफ१४७व्ही | -- | १ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २८/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४६२**

पुणे महानगरपालिका मा.मुख्य सभा ठराव क्र. ३११ दि.२८/८/२०१९ मधील संदर्भ क्र. ६ च्या देण्यात आलेल्या उपसूचनेनुसार पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टवर सर्व पक्षनेत्यांचा समावेश करणेस व सभासद वाढविणेबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३४ दि. १७/८/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २५/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

**विषय क्र. ४६३**

पुणे महानगरपालिकेकरीता माहिती तंत्रज्ञान सल्ला सेवा देणारे मे.प्राईस हाऊस वॉटर कुपर्स प्रा.लि. यांच्या कामास मुदतवाढ देणेस व माहिती तंत्रज्ञान सल्ला सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी M/s.Ernst & Young यांची दोन वर्षांकरीता नियुक्ती करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मावतं/२४० दि. २०/८/२०२० चे पत्र.

1) मे.महाराष्ट्र शासन निर्गमित मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमुद शासन निर्णयानुसार मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि. यांना शासन निर्णयामधील Designation प्रमाणे नमूद केलेल्या मनुष्यबळ उपलब्ध करून घेतल्यानुसार शासन निर्णयातील तरतूदी व दर पत्रकानुसार र.रू.98,38,500/- (अक्षरी अठ्यानव्व लाख अडतीस हजार पाचशे फक्त) बिल अदा करणेस

२) मे.प्राईस वॉटर कुपर्स प्रा.लि.यांना मे.महाराष्ट्र शासन निर्णयातील तरतूदीनुसार, दरपत्रकानुसार तसेच नमूद कालावधी (दि.01/12/2019 ते 31/08/2020 पर्यंत) उपलब्ध करून घेणेस.

३) मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि.यांना मुदतवाढीचा कार्यादेश देणेस.

४) M/s.Ernst & Young प्रतिमहा र.रू.9,20,700/- (करविरहित) यांची 2 वर्षांकरीता नेमणूक करणेस.

५) M/s.Ernst & Young यांना कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस.

६) भविष्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जीआर(GR) नुसार होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने बिल अदा करणेस

७) M/s.Ernst & Young यांना पुणे मनपाच्या गरजेनुसार कमी अधिक प्रमाणात आवश्यक मनुष्यबळ घेऊन शासन निर्णय महाराष्ट्र शासन, डायरेक्टर ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी यांचेकडील शासन निर्णय क्र.मातसं.080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT(MH) मंत्रालय, मुंबई दि.09/05/2019 मध्ये नमूद दरानुसार बिल अदा करणेस.

८) सदर रक्कम RE11N103 (सन 2020-2021) अर्थशिर्षकातून खर्च करणेस.

१ मुख्यदेखरेख वसुली वगैरे

ड सांख्यिकी व संगणक प्रमुख

३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकमार्फत करून घेणे व तदनुषंगिक कामे करणे.

**विषय क्र. ४६४**

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी अंतर्गत कोविड-१९ या करिता प्रभाग क्र. ३८ व ४१ मध्ये कॅन्टेमेंट झोन सील करणे व सीसीसी सेंटर व अवेटेड सेंटर येथे आवश्यकतेनुसार पत्र्याचे शेड उभे करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे हे काम अत्यंत महत्वाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सीकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/२५२ दि.२६/८/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी अंतर्गत कोविड-१९ या करिता प्रभाग क्र. ३८ व ४१ मध्ये कॅन्टेमेंट झोन सील करणे व सीसीसी सेंटर व अवेटेड सेंटर येथे आवश्यकतेनुसार पत्र्याचे शेड उभे करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणेस

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी – RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२) मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांचेशी करार करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.२८/४/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस

**विषय क्र. ४६५**

महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनिसिपल कर्जरोखे धारण करणार यांचे माहितीकरीता दि. ३१/३/२०१९ अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्ज/कर्जरोखेच्या रकमांचे व कर्ज/कर्जरोखे बाकीसंबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिध्द करणेस व त्यांच्या प्रती महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/२५३ दि. २७/८/२०२० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअ‍ॅप द्वारे कळविण्यात येईल.**